# प्रकरण तिसरे

# 'उनसावली' आशयविचार

# प्रकरण तिसरे

# 'उनसावली' आशयविचार

**प्रास्ताविक :-**

मागील प्रकरणात आपण नामदेव कांबळेंच्या जीवनचरित्राचा व वाङ्मयाचा परिचय करून घेतला. त्याचबरोबर त्यांच्या साहित्यविषयक, जीवनविषयक दृष्टिकोनाचा विचार केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला 'उनसावली' कादंबरीचा वाङ्मयीन अभ्यास करावयाचा आहे. 'राघववेळ', 'उनसावली' आणि 'सांजरंग' या तीन कादंबऱ्यांच्या मालिकेतील 'उनसावली' व 'साजरंग' या शेवटच्या दोन कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यातून मांग समाजाचे दु:ख, मांग समाजाचा शोषण मुक्तिसाठी झगडा याचे चित्रण कादंबरीकाराने घडविले आहे. मागासवर्गीयांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्या त्यांच्या जीवनाला वेटाळुन टाकतात उद्याच्या जीवनाची भ्रांती त्यांना कशी भेडसावते याचे वास्तव चित्रण 'उनसावली' कादंबरीत रेखाटले आहे. ऊनसावलीचा नायक रघू मांग समाजातील आहे. त्याची आई निरक्षर असूनही ती रघू व सीताराम या दोन्ही मुलास शिक्षणासाठी पूरसदला पाठवते. आंबेडकरांच्या तत्वज्ञानाने भारावून गेलेला रघू आपले शिक्षण घेत राहतो आहे.

कथानक हा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे. कादंबरीतील विषय हा कथा वस्तूच्या माध्यमातून मांडला जात असतो. कथानकात घटनांची गुंफण व कार्यकारण संबंध महत्वाचा असतो. त्यादृष्टीने कथानक महत्वाचे ठरत असते. ''कादंबरी ही माणसांची गोष्ट असते. खरे म्हटले तर ती प्रश्न पडलेल्या माणसांची गोष्ट असते.''[१] असे फडक्यांनी नमूद केल्याप्रमाणे नामदेव चं. कांबळे यांच्या कादंबरीतील दलित जीवन जगणाऱ्या माणसाची गोष्ट समजून घेणे गरजेचे आहे.

ही कादंबरी मराठी दलित साहित्य, समाजशास्त्र आणि वाचक या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. युगेची युगे अनुसूचित समाजाचे झालेले शोषण वेधकपणे कथानकाच्या माध्यमातून कादंबरीकाराने उत्कट केले आहे. दलित कादंबरी लिहून लेखकाने मागासवर्गीय समाजाची तत्कालीन आर्थिक, सामाजिक, धार्मिक परिस्थिति व आंबेडकरांच्या विचारसरणीचा पडलेला प्रभाव या कादंबरीतून प्रकट केला आहे. मागासवर्गीयांच्या शैक्षणिक परिस्थितीचे स्वरुपही प्रकट केले आहे. दलित समाजातील महत्वाचे

प्रश्न घेऊन सामाजिक शास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासाच्या अनुषंगाने कादंबरीकाराने वाचकाला अंतर्मुख केले आहे यादृष्टीने या ग्रंथाचे आगळे वेगळेपण शोधून स्पष्ट करण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे.

**राघववेळ ते साजरंग एक सलग कथायात्रा :-**

पुण्याच्या देशमुख आणि कंपनीने नामदेव चं. कांबळे यांची १९८३ साली 'राघववेळ' ही कादंबरी प्रकाशित केली. विदर्भातील या लेखकाने त्यानंतर 'राघववेळ', 'उनसावली' आणि 'साजरंग' या तीन स्वतंत्र कादंबऱ्यातून मातंग समाजाच्या जीवनाचे, त्या समाजातील वालंबीचे एकच सलग कथानक मांडून कादंबरीत्रयीचा अपूर्व प्रयोग केला आहे.

'राघववेळ' या कादंबरीला १९९५ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आणि राघववेळ बरोबरच नामदेव चं. कांबळे यांचे नाव मराठी साहित्यक्षेत्रात सर्वतोमुखी झाले. त्यापूर्वी 'राघववेळ' ला मराठी साहित्य परिषदेचा 'कै. ह. ना. आपटे पुरस्कार', अ.भ.साहित्य संमेलनात दिला जाणारा वासंती गाडगीळ प्रतिष्ठानचा 'कै. बा. सी. मर्ढेकर' पुरस्कार आणि विदर्भ साहित्य संघाचा कै. ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार हे तीन सन्मान प्राप्त झाले होते. अल्पावधीतच 'राघववेळ' च्या तीन आवृत्त्याही प्रकाशित झाल्या.

'राघववेळ' पूर्वी काही कविता आणि कथा त्यांच्या नावावर होत्या तथापि नामदेव कांबळे या सजग जाणिवेच्या लेखकाचा पिंड केवळ कथा काव्यात अडकणारा नव्हता. दलित साहित्यामध्ये कथा, कविता आणि आत्मकथने मोठ्या संख्येने प्रसिध्द झाली आहेत. त्यामानाने कमी प्रमाणात लेखन झालेल्या कादंबरी लेखनात नामदेव कांबळे यांनी कादंबरी लेखनाचे उचललेले पाऊल महत्त्वपूर्ण ठरले. कादंबरीच्या स्वरुपात त्यांनी दलित जीवनाची वेदना आणि हुंकार मांडला. दलित जीवनाकडे समग्रपणे वास्तववादी दृष्टीने पाहण्याच्या जाणीवेतून, जीवनाचा अर्थ समरसतेतून समजून घेण्याच्या प्रयत्नातून कांबळेंनी दीर्घ जीवनपटच 'राघववेळ', 'उनसावली' आणि 'सांजरंग' या तीन कांदबरीतून मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. हे कादंबरी लेखन आत्मवृत्तपर नाही. ह्या तीन कादंबऱ्या मिळून एका कथानकाचा कालपट तयार होतो 'राघववेळ' ते 'सांजरंग' ही एक सलग कथायात्रा आहे.

दलित जीवनाची पार्श्वभूमी असलेल्या 'राघववेळ', 'उनसावली' आणि 'सांजरंग' या तीन कादंबऱ्यांमधून मातंग समाजात जन्मलेल्या ते जीवन अनुभवलेल्या नामदेव कांबळेंनी मातंग समाजाचे वास्तव कादंबरीच्या रूपाने मांडण्यात निश्चित यश मिळविले आहे.

या तीन कादंबऱ्यामधून येणाऱ्या जीवनपटाचा पहिला भाग म्हणजे 'राघववेळ' ही कादंबरी होय 'राघववेळ' म्हणजे प्रारंभ. पहाट, दिवसाची सुरुवात. तसाच कथानकाचा आरंभ. शहरापासून दूर एका खेड्यात, वसारीत बौध्द् वेटाळाच्या बाजूला गावकुसाबाहेर मांगवाड्यात रेखीव टापले विणणाऱ्या परंतु दम्याने अकालीच मरण पावलेल्या कळणू जाधवच्या पश्चात पंचवीशी-तिशीत नशिबी वैधव्य आलेल्या त्याच्या बायकोची वालंबीची आणि तिच्या रघू, सीताराम ह्या दोन मुलांची आणि कौसा ह्या एका मुलीची ही कहाणी आहे. कळणू मेल्यावर वालंबीच्या खांद्यावर कुटुंबाच्या पालनपोषणाचे ओझे पडते. चौघांचे हे कुटुंब गावकी आणि भावकी जोपासात केवळ पोटाची भूक भागवण्यासाठी काबाडकष्ट करीत राहते. नवऱ्याच्या पाठीमागे मुलांच्या पोटाची खळगी बुजवताना, वालंबीची घुसमट होत राहते. मुलांच्या शिक्षणासाठी वालंबी अधिकाधिक कष्टाची कामे करीत राहते. गावातील स्त्रियांची बाळंतपणे करुन, गावकी मागून वालंबी मुलांना जगवते. प्रस्थापित समाजातील यादव, गोपाळराव देशमुख यांच्यासारखी माणसे एकाकी जीवन जगणाऱ्या वालंबीला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात. तिच्या गरीबीचा, वैधव्याचा फायदा घेऊ पाहतात.पण वालंबी त्यांच्या वासनेला बळी पडत नाही. आयुष्यभर शिल जपते. अशा वातावरणात 'राघववेळ' ची कथा आकार घेते. राघववेळमध्ये रघू वालंबीचा मोठा मुलगा प्राथमिक शाळेमध्ये शिकत असतो. त्याच्या प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाचा प्रवास या कादंबरीमध्ये येतो. वालंबीची ही तिन्ही लहान मुलं रघु, सीताराम, कौसा आपल्या आईला कामात मदत करीत राहतात. परंतु या दलित कुटुंबाचा कष्ट करुनही भुकेचा प्रश्न सुटत नाही. त्यातच आपला मुलगा रघू शिकून साहेब होईल ही ध्येयवेडी आशा उरात बाळगून वालंबी रघू व सीतारामला शिकवण्यासाठी धडपडत राहते.

''वालंबी कथानकाचे केंद्र आहे. रघू, सीताराम आणि कौसा ही वालंबीची मुलं तिच्या जीवनाची अर्थपूर्णता आहे.''[२] असे यासंदर्भात किशोर सानप म्हणतात ते उचित वाटते.

विधवा झालेली वालंबी 'राघववेळ'च्या कथानकात गावकी आणि भावकीच्या वादळवाऱ्यात स्वत:चये पाय जमिनीत घट्ट रोवून आपले कुटुंब ताकदीने पेलण्याचा प्रयत्न करीत राहते. जीवन संघर्ष करताना ती कधी मोडून पडत नाही. तिचा पायही कधी वाकडा पडत नाही. 'राघववेळ' मध्ये कांबळे यांनी वालंबीच्या व्यक्तिमत्वाचे सखोल चित्रण केले आहे. वालंबीचे कष्ट वाया जात नाही. अडाणी, निरक्षर, सुशील वालंबीच्या संस्कारात लहानाचा मोठा झालेला रघू प्रचंड जिद्द मनात ठेवून प्रतिकूल परिस्थितीतही मॅट्रिकची परीक्षा पास होतो. इथपर्यंतचा भाग नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ' या कादंबरीत येतो. ''मांग समाजाचे, मांग समाजातील विधवा वालंबीच्या कुटुंबाचे, वालंबीच्या मुलाच्या रघू उर्फ रघूनाथ कळणू जाधवच्या शिक्षणविषयक जिद्दीचे चित्रण करणारी 'राघववेळ' ही कादंबरी आहे एका अर्थाने व्यक्ती आणि समष्टीच्या मूलभूत जीगिषेची ही कहाणी आहे. स्त्रीच्या मूलभूत, निसर्गदत्त आवाहन क्षमतेची आणि आव्हान क्षमतेची ही कथा आहे.''[३] असे मत डॉ. रविंद्र शोधणे यांनी मांडले आहे. या कादंबरीत लेखकाने मांग या शोषित समाजाच्या जीवनाचे चित्रण अत्यंत खोलवर जाऊन केले आहे

'राघववेळ' या कादंबरीत मांग समाजातील एका कुटुंबाच्या जीवनानुभवाचे चित्रण आढळते तर 'उनसावली' आणि 'सांजरंग' या भागातून मांग समाजाचे दु:ख, मांग समाजाचा शोषण मुक्तिसाठी झगडा याचे चित्रण आले आहे. 'राघववेळ' ते 'सांजरंग' या कादंबरीत्रयीपैकी केवळ 'उनसावली' आपण वाचली तर आपल्याला या संबंधित कथानकाची नीटशी ओळख होऊ शकणार नाही. कारण यामधील घटना-प्रसंग हे 'राघववेळ' या कादंबरीशी संबंधित आहेत. त्यामुळे या कादंबऱ्या परस्परपूरक आहेत.

**उनसावली या कादंबरीचे कथानक :-**

'उनसावली' ही राघववेळ नंतरची सलग कथानक असणारी दलित कादंबरी आहे. ही कादंबरी १९९७ साली प्रसिध्द झाली. ही कादंबरी देखमुख आणि कंपनीनेच प्रकाशित केली. २९१ पृष्ठाच्या या कादंबरीत राघववेळ नंतरचा कथाभाग आला आहे. राघववेळ प्रकाशित करतानाच ही कादंबरी एकुण तीन भागांमध्ये प्रकाशित करण्याचा मनोदय देशमुख आणि कंपनीने जाहीर केला होता. त्यामुळे 'राघववेळ'च्या संकल्पित तीन भागातील दुसरा भाग म्हणजे 'उनसावली' होय.

'उनसावली' ही मातंग समाजातील उच्च शिक्षणाच्या दिशेने झेपावणाऱ्या, प्रगतीच्या आत्मभानाने वाटचाल करणाऱ्या दलित तरूणाची कहाणी आहे. या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा वि. स. खांडेकर पुरस्कार मिळाला आहे. उनसावलीत राघववेळ मधला शाळकरी रघुनाथ कळणू जाधव हा मांग समाजातील मुलगा महाविद्यालयात जाऊ लागलेला तरूण युवक झाला आहे. या रघूच्या जीवनातील चढ-उतार, संघर्ष उनसावलीत आला आहे. त्यामुळे उनसावली ही रघुनाथ कळणू जाधव या मांग जमातीत जन्माला आलेल्या मुलाची कथा ठरते. रघुला आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करताना आलेली सुख-दु:खाचे अनुभव कादंबरीकाराने या कादंबरीत चित्रित केले आहेत.

आपले खेडेगाव सोडून कधीही परगावी न गेलेला रघु महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुसदला जातो. तेथील वसतिगृहात राहू लागतो. वालंबी आणि भाऊ सीताराम वसारीला एकमेकांची काळजी घेत राहतात. महाविद्यालयीन शिक्षणाच्या निमित्ताने प्रथम रघु आपले गाव, घर, आई, भाऊ सोडून निघाला असल्यामुहे हळवा होतो आपल्या छायेत आणि मायेत लहानाचा मोठा झालेला रघू घर सोडून शहरात निघाला म्हणून वालंबी आई म्हणून त्याची काळजी करीत राहते. रघु स्वभावाने मात्र समजूतदार आहे. 'शिकायचे म्हटल्यावर मन तर मारावेच लागेल.' असे म्हणून रघु परिस्थितीचा सहज स्विकार करतो. जाताना तो वडिलांच्या पाठीमागे वडिलासमान असलेल्या चुलत्याला पायरु काकाला भेटल्याशिवाय जात नाही. पायरु ही वडिलकीच्या नात्याने त्याला सांगतो, 'शिकायचं सोडून काहीही करु नकोस.' आपल्या आईबरोबर काका पायरु व काकू हरणी यांचे आशीर्वाद घेऊन तो पुसदला जायला निघतो. गावच्या बौध्द समाजातील राजाराम कांबळे बरोबर रघु बसमध्ये चढतो. पण त्याचे मन मात्र आईच्या काळजीने काळवंडलेले असते. ती एकटी पडेल, कसे निभावेल असे प्रश्न त्याचे मन व्यापून टाकतात. साठ टक्के मार्क मिळवून मॅट्रिक झालेला रघु घरच्या काळजीचे ओझे घेऊन अस्वस्थ मनानेच कॉलेज शिक्षणासाठी घराबाहेर पडतो. औरंगाबादला राहण्याची सोय नसल्याने मात्र पुसदला वसतिगृहाची सोय असल्याने रघुने राजारामच्या सांगण्यावरुन महाविद्यालयीन शिक्षण पुसदला घ्यायचे ठरविलेले असते. पेटीत ताट, वाटी, प्याला, आईने प्रेमाने करुन दिलेला जेवणाचा डबा फडक्यात गुंडाळून ठेवलेला असतो. मात्र वसारी ते पुसदच्या प्रवासात रघुचे मन आईच्या काळजीने ग्रासून गेलेले असते.

पुसदला कॉलेजच्या वातावरणात रघुचे मन रमायला लागले तरी कॉलेज वातावरणात वावरताना रघुला वसतिगृहातील मुलांच्याकडून आपलेपणाची भावना किंवा सहकार्य सहसा मिळत नाही. अभ्यासात त्याचे लक्ष लागत नाही. मुले अभ्यासही करु देत नाहीत. त्यातच गावाकडील आईची, भावाची, चुलत्याच्या कुटुंबाची सारखी आठवण होत राहते आणि म्हणून रघू आपल्या आईला पत्र लिहितो आणि पत्र मिळताच आईकडून पत्र पाठविण्याची अपेक्षा करतो वसतिगृहातील उनाडक्या करणारी मुले अभ्यास करीत नाहीत. उलट अन्य मुलांसारखी मौजमजा न करता आई व भावाची काळजी करीत राहणाऱ्या रघुला पुस्तकातील किडा म्हणून चिडवतात. रघु आपली पुस्तके उचलून कॉलेज ग्रंथालयाची वाट धरतो. आणि तेथे प्राचार्याकडून अभ्यासू विद्यार्थी म्हणून चौकशी केली जाते रघूची प्राचार्य साहेबांशी ओळख होते राजाराम वसतिगृहात भांडीकाम करणाऱ्या सारजा मावशी व तिची नात गुंफाशी रघुची ओळख करुन देतो आणि रघु तुमच्याच मांग समाजातील आहे म्हणून सांगतो.

एके दिवशी सारजा मावशी दिसत नाही, म्हणून गुंफाला विचारल्यावर सारजा मावशी आजारी आहे असे समजल्यावर हळव्या, कोमल मनाचा रधु सारजा मावशीची भेट घेण्यासाठी धडपडतो. तर गुंफाशी लगट करण्याचा रघुचा प्रयत्न दिसतो आहे असे वाटून राजाराम त्याच्यावर शंका घेतो.

सारजा मावशीने भेटायला बोलावे आहे असे गुंफाने सांगितल्यावर तिच्याबरोबर जाऊन नेहरुनगरमध्ये राहणाऱ्या सारजा मावशीची रघु भेट घेतो. सारजा मावशीची आपुलकीने चौकशी करतो आणि परत येत असताना, त्याच्याच वर्गात शिकणाऱ्या माधव देवकातेच्या आग्रहाखातर त्याच्या घरी चहा घ्यायला जातो. मांग समाजातील माधव देवकातेच्या घरातील टापटीप, लाकडी फर्निचर बघून रघू दिपून जातो. तेथेंच माधव आपल्या वडिलांशी वामनदाव देवकाते यांच्याशी रघुची ओळख करुन देतो. चहा घेऊन आलेल्या आणि आठवीत शिकणाऱ्या आपल्या मुलीशी नंदाशी वामनराव देवकाते रघूची ओळख करुन देतात. बौध्दापासून जपून राहा. गरज संपली तुला दूर करतील, ह्या संदेशाबरोबरच मांगासवर्गीय वसतिगृह समितीचे सदस्य वामनराव देवकाते तेथील सोयींनीयुक्त अवसलेल्या वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी रघुला अर्ज करायला सांगतात. माधव देवकाते याच्या घरुन चहा घेऊन निघालेल्या रघूच्या तारुण्यसुलभ मनात मात्र नंदा, गुंफाचे विचार मात्र फेर धरुन नाचायला लागतात. वसतिगृहातून गुंफासोबत सारजा

मावशीच्या घरी गेला म्हणून रघुला मुलांच्याकडून चिडवले जाते. वैतागलेला रघू मात्र आपली डायरी उघडून आपल्या भावना, विचार कागदावर लिहू लागतो.

एकाच जातीतील रघू आणि सारजा मावशी व तिची नात गुंफा भावनिक पातळीवर एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यातून ''गरीबाचं लेकरु तू गरीबातलेच गरीबाचा कळवळ असतो रधु'' या सारजामावशीच्या समंजस बोलण्याने रघुला आधार मिळत जातो. याचकाळात तारुण्यसुलभ भावनेचे द्वंद्व मनात निर्माण झालेला रघू आपल्याला शिकायचे आहे, शिक्षणासाठी आपण इथे आलो आहोत असा विचार करीत आपल्या मनाला बळ देत राहतो.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच, रघू आजूबाजूच्या समाजातील राजकीय, सामाजिक जीवन अनुभवतो. दलित समाजातील मतलबी कार्यकर्त्यांचे वागणे रघूला अस्वस्थ करीत राहते. कॉलेजमधील निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर युवक क्रांतीदल व विद्यार्थी एकता दल या दोन्ही मागासवर्गीय पॅनेल्स मधील मुलांच्या गटवार विभागणीने महाविद्यालयात राजकीय तणावाचे वातावरण तयार होतो. मात्र रघू या दोन्ही दलात असून नसल्यासारखा वावरत राहतो. कोणत्याही पक्षात तो सहभागी होत नाही. आपले घर, परिस्थिती, आई, त्याच्या डोळ्यासमोर असल्याने कॉलेज निवडणूकीच्या गटातटात तो भाग घेत नाही व त्याला ते पटतही नाही. आपण घर सोडून शिकायला आलो आहे हे मनोमन ठरवून रघू कॉलेजमधील निवडणुकीपासून स्वत:ला दूर ठेवतो. निवडणूकीचा दिवस उजाडल्यावर रधू मतदान करतो आणि माधवच्या सांगण्यानुसार त्याच्या घरी जातो. युवक क्रांतीदलाला बहुमत मिळते आणि एकता दलातील मुलांचा रोष रधुला सहन करावा लागतो. कॉलेजमधील निवडणुकीच्या झालेल्या मारामारीत त्याची फरपट होते, त्याला मार खावा लागतो. निवडणुकीच्या वास्तव दर्शनाने त्याचे मन नाराज होतो. त्याच्या गावच्या राजाराम कांबळेचाही त्याला आधार वाटत नाही.

वसारी गावातही अनेक घटना घडत राहतात. रघूचा चुलता पायरु मांग जातीमुळे गावाशी गावकीच्या कामाने बांधला गेलेला असतो. त्याला गावातील वामन भोजाजीचा दुखवटा सांगण्यासाठी दुसऱ्या गावाला जात् असताना अपघाताला सामोरे जावे लागते. तो पुरात सापडतो आणि मरता मरता वाचतो. पण मरीमायच्या कृपेनेच आपण वाचलो असे वाटून तो साऱ्यांना भेटायला बोलावतो. रघुही आपल्या

चुलत्याला भेटायला वसारीला येतो. मात्र गावकीच्या कामासाठी आपल्या चुलत्याला झालेला अपघात रघुला सहन होत नाही

महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम साजरा होतो. त्यात इतरांच्याबरोबर रघुला 'अस्तीन का साप' फिश पॉड मिळतो. त्याचे मन नाराज होतो. आपल्या मनाला तो आधार देत राहतो. कॉलेज जीवनातील कटू अनुभवानींच जणू तो घडतो. एका रात्री अभ्यासिकेत अभ्यास करीत असताना प्राचार्याशी रघुशी चर्चा होते. त्यातून त्याला कॉलेजमधील लायब्ररीमध्ये काम मिळते. महिन्याला तीस रूपये पगार निश्चित होतो. ग्रंथालयात काम करताना अवांतर वाचन करता येईल याचा आनंद रघुला होतो परीक्षा संपल्यावर रघू गावाकडे आल्यावर आईसोबत मिळेल ती कामे करत राहतो नंतर सुट्टी संपल्यावर पुसदला गेल्यावर त्याला सरकारी वसतिगृहात प्रवेश मिळतो. या कामी वामनराव देवकाते यांची मदत झालेली असते. पुढे प्राचार्यांच्या सातवीत शिकणाऱ्या मुलाला शिकवण्याचे पैसे रघुला मिळतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या रघुची बौध्दिक जडणघडण होते अभ्यासाबरोबर वाचनाचा छंद जोपासून रघु आपले व्यक्तिमत्त्व घडवितो. फुले, आंबेडकर वाचत राहतो. ६ डिसेंबरला आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिवशी आयोजित केलेल्या परिसंवादात रघू आंबेडकरांच्या अधिष्ठानावर ठणकावून बोलतो.

दरम्यानच्या काळात टायफाईडने आजारी पडल्यावर वामनराव देवकाते रघुला घरी घेऊन जातात. त्यातून नंदा आणि रघू एकमेकांकडे आकर्षिले जातात. देवकातेही धूर्तपणे आपल्या नंदासाठी रघु भावी जावई म्हणून त्याच्याशी स्नेह वाढवतात. रघूला देवकाते यांच्या घरी पाहण्यासाठी आल्यावर वालंबी नंदाला सून म्हणून हवीशी वाटते. गुंफाचे लग्न रघुबरोबर व्हावे अशी सारजा मावशीची इच्छा असते. पण अडाणी गुंफाचा प्रस्ताव फेटाळून वामनराव देवकाते यांनी पुढाकार घेतल्यामुळे रघूचा नंदाशी विवाह निश्चत होतो आणि देवकाते यांच्या सहकार्यामुळे रघूची नोकरी ही कायम होते वालंबी या सुखद प्रसंगी कळणूशी संवाद साधते आणि कथानकाचा शेवट होतो.

**कथानकाचा आशय :-**

'उनसावली' ही अंधरातून प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या युवकाची कहाणी आहे. शाळकरी रघूनाथ 'उनसावली'त महाविद्यालयीन शिक्षण घेतो. रघूच्या जीवनातील संघर्ष या कादंबरीत आला आहे. श्रावणात उनपावसाचा खेळ सुरु असतो. मात्र रघूच्या जीवनात सावलीपेक्षा उन्हाच्या झळा अधिक जाणवतात मात्र प्रतिकूल परिस्थितीतही वाचन, संस्कार, यामुळे तो संस्कारक्षम संवेदनशील माणूस घडतो. वालंबीची सशक्त व्यक्तीरेखा रेखाटण्यात कादंबरीकाराने यश मिळविले आहे.

'उनसावली' ही नामदेव चं. कांबळे यांची दलित समाजाचे चित्रण करणारी सामाजिक कादंबरी आहे या संदर्भात श्री.कुलकर्णी यांचे प्रा.जान्हवी संतांनी नोंदविलेले मत महत्वाचे वाटते. ''विशिष्ट समाजाचे चित्र रेखाटणे, समाजस्थितीचे दर्शन घडविणे सामाजिक समस्यांना पुढे आणणे यापैकी एक किंवा अनेक हेतूंनी प्रेरीत होऊन कादंबरी लिहिली असेल व तो तिचा हेतू सिध्दीस गेला असेल तर अशा कादंबरीला सामाजिक कादंबरी म्हणावे.''[४] सामाजिक कादंबरीतील व्यक्ती व घटना लेखकाच्या भोवतालच्या परिसरातील असतात. त्यामुळे त्या प्रातिनिधिक स्वरुपाच्या असतात. अशा व्यक्तींना केवळ व्यक्ती म्हणून महत्व नसते. तर समाजाचा प्रतिनिधी म्हणून महत्व असते. उदाहरणार्थ हरिभाऊंच्या कादंबरीतील पात्रे होय. 'यमू' तत्कालीन विधवा स्त्रीचे दुःख व तिचे जीवन हे तिचे एकटीचे नसून त्या काळातील असंख्य स्त्रियांचे ते जीवन असते. 'उनसावली'तला रघू हा देखील मांग समाजाचे या समाजाच्या व्यथेचे प्रतिनिधित्व करतो. रघूला शिकवण्यासाठी त्याची माय वालंबी अहोरात्र कष्ट करते. स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली तरी त्यांचे शोषण थांबले नाही त्यांची आर्थिक परिस्थिती एवढी बिकट की जगण्यामरण्याचा प्रश्न होता. अशा परिस्थितीतून महाविद्यालयीन शिक्षण घेणारा रघू हा कोणी व्यक्ति म्हणून आपल्या पुढे येत नाही तर दलित, शोषित समाजातील शिक्षण घेणाऱ्या व्यक्तिचे प्रतिनिधित्व करताना आढळतो 'उनसावली' कादंबरी ही प्रथम सामाजिक कादंबरी आहे व नंतर वास्तववादी कादंबरी आहे. कारण वास्तववादी कादंबरी सामाजिक असतेच असे नाही, परंतु प्रत्येक सामाजिक कादंबरी ही वास्तववादी असलीच पाहिंजे. सामाजिक पार्श्वभूमी हा सामाजिक कादंबरीचा प्रमुख घटक असतो. या कादंबरीत गौण पात्रांद्वारे दलित समाजाच्या चालीरीतींचे, त्यांच्या आचारविचारांचे, धार्मिक, नैतिक समजुतीचे, घडामोडीचे

व कौटुंबिक जीवनाचे चित्रण आले आहे. मात्र वालंबी व रघू या दोन व्यक्तिचित्रणातून कादंबरीचे कथानक साकार होते.

**'उनसावली' कादंबरीतील व्यक्तिचित्रणे :-**

**रघू :-**

कादंबरी ही जीवनाचा पट दिग्दर्शित करत असते. या कादंबरीचे संपूर्ण कथानक रघू व त्याची आई यांच्या भोवती फिरत असते. ही दोन व्यक्तिचित्रे बाजूला काढून ठेवली तर कादंबरी अपुरी वाटते. रघू जीवनात सदैव संघर्ष आहे. ही व्यक्तिरेखा अतिशय संयमी आहे. रघु या कादंबरीतील महत्वपूर्ण व्यक्तिरेखा आहे आपल्या गावी वसारीला मॅट्रिकची परीक्षा पास होऊन पुढे हा रघू महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुसदला येतो. तेथील फुलसिंग महाविद्यालयात प्रवेश घेतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तो पदवी परीक्षा देतो. जीवनसंघर्षात सुख सहज मिळत नाही हाच अनुभव त्याला येतो. शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या सतरा-अठरा वर्षाच्या रघूला अनेक बरेवाईट अनुभव अनुभवायला मिळतात. दारिद्र्यामुळे तो अकाली प्रौढ झालेला जाणवतो. वसतिगृहात राहणारी मुलेही त्याला समजून घेत नाहीत. प्राध्यपकांना वर्गात मुले शिकवू देत नाहीत, रघूला प्रश्न पडतो मुले शिकवू का देत नाहीत ? ज्ञान ही शक्ती आहे. असे ज्ञान रघूला हवेहवेसे वाटते राहते. त्यातून त्याचे ज्ञानप्रेमच स्पष्ट होते. अनेक संघर्षाच्या, अडचणीच्या प्रसंगी तो संतापाने मनातल्या मनात कुढत राहतो. राग गिळतो. फार तर आपल्या रागाला मनातल्या मनात वाट काढून देतो. आपला राग व्यक्त करणे, संयम गमावून बसणे परवडण्यासारखे नाही. त्याचे परिणाम कदाचित विपरीत घडतील. या जाणीवेने संयमी स्वभावाचा रघू हळूहळू सहनशील होत जातो. कादंबरीकाराने त्याचे व्यक्तिमत्व विचारी रंगवले आहे. कॉलेजच्या निवडणुकीत तो तटस्थ राहतो. त्याच्या तटस्थपणामुळे त्याला वारंवार अपमान सहन करावा लागतो.

कॉलेज जीवनात अन्य मुलांसारखे मौजमजा करुन आपल्याला चालणार नाही. लहान भावाला शिकवायचे आहे. वसारीत कष्ट करणाऱ्या आईला सुखी करायचे आहे आणि त्यासाठी शिकून मिळवते झाले पाहिजे. ही कौटुंबिक सहानुभूती आणि त्यातून रघूच्या जीवनाची होणारी वाटचाल 'उनसावली' या कादंबरीत श्री. कांबळे यांनी अतिशय हळूवारपणे मांडली आहे शिक्षणामुळे त्याच्या वागण्या-बोलण्यात विचारशीलता,

चिंतनशीलता प्राप्त झाल्याने त्याच्याकडून आवेश, आक्रोश, विद्रोह, व्यक्त होत नाही.

रघूला श्रमाची चाड आणि दारिद्र्याची चीड असलेली दिसून येते. त्यामुळे तो श्रम करायला लाजत नाही की आळस करत नाही. कारण परीक्षा झाल्यावर पुसदहून तो वसारीला आल्यानंतर सुट्टीच्या काळात 'वालंबी' नको नको म्हणत असताना ही मजूरीने शेतावर कामाला जातो. पाटबंधाऱ्याचे काम स्वीकारतो, खडी फोडायला जातो किंवा घरी फडे, टोपल्या तयार करुन बाजारात नेऊन विकतो व सन्मानाने श्रममूल्यांची जोपासना करुन पैसे मिळवतो. तसेच आईला घरकामात झाडू मारणे, दळण आणणे, पाणी भरणे इ. कामांची मदत करतो.

रघूच्या व्यक्तिमत्त्वातून व्यक्त होणारा हा श्रमप्रतिष्ठेचा गुण आजच्या तरुण पिढीसाठी अनुकरणीय ठरावा असाच आहे. आजचे बहुतांशी तरुण आपल्या आई-वडिलांसोबत आपल्या शेतात श्रम करताना संकोच करतात किंवा अंगमेहनतीची कामे करणे त्यांना किळसवाणे, कमीपणाचे वाटते. आमचे आजचे शिक्षण सुध्दा श्रमबचाव शिक्षण आहे. येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ''कमवा आणि शिका'' या स्वावलंबी शिक्षण योजनेचे महत्त्व लक्षात येते.

नामदेव चं. कांबळे यांच्या कादंबरीचा नायक रघू हा नव्या विचारांचे नेतृत्त्व करीत असताना, अंधश्रध्देला कडाडून विरोध करताना दिसतो. आपल्या आचरणाने अंधश्रध्दा व रुढी परंपरेतील कर्मकांड ठोकरुन लावतो. पायरुच्या तेरवीच्या प्रसंगी पिंडाला शिवण्यासाठी कावळे जवळ येत नाहीत. कारण जवळच मेलेल्या ढोराचे मांस खाण्यात ते गढून गेलेले असतात. पिंडाला कावळ्याने शिवणे गरजेचे आहेच असे विज्ञाननिष्ठ रघूला गरजेचे वाटत नाही. त्यावेळी तो येसोंत्याला डोळे मिटायला सांगतो, आणि पिंड स्वतःच्या तोंडात टाकून नदीच्या पाण्यात सोडतो आणि नंतर येतोंत्याला डोळे उघडायला लावून पिंड कावळ्याने उचलून नेहला असे सांगतो. यावेळी रघूने केलेली कृती अंधश्रध्देविरुध्द ठरते.

रोग झालेल्या दिलिपला मांत्रिकाकडे नेण्याऐवजी डॉक्टरकडे नेऊन औषधोपचार करणे त्याला योग्य वाटते. त्याचप्रमाणे आपल्या समाजातील लोकांनी देवाच्या नावाने नवस बोलून ते फेडण्यासाठी कर्ज काढणे त्याला आवडत नाही. त्यामुळे तो सुधारणावादी वाटतो.

रघूला आपल्या गरीब परिस्थितीची जाणीव असल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच ग्रंथालयात, प्राचार्यांच्या घरी मुलाला शिकवण्याचे काम करतो. प्राचार्य सरांच्याकडून मिळालेले शिकवणीचे तीस रुपये आईसाठी, सीतारामच्या वह्यापुस्तकासाठी घरी पाठवतो. या जाणीवेतूनच आपल्याला स्वावलंबी होऊन अर्थार्जन करणे गरजेचे आहे असे त्याला वाटत राहते.

नामदेव चं कांबळे शिक्षक असल्याने त्यांनी आपल्या कादंबरीतून रंगविलेली रघूची व्यक्तिरेखा एक तेजस्वी विद्यार्थी म्हणून चित्रित होते. कॉलेजच्या लायब्ररीत नोकरी मिळाल्यावर तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म. फुले वाचायचे ठरवतो. आंबेडकरांनी लिहिलेली पुस्तके वाचतो. अभ्यासतो. त्यातून डॉ.आंबेडकर समजावून घेतो त्यांच्यावर स्वतंत्रपणे विचार करुन डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी केलेल्या भाषणातून आपल्या विचारांचे दर्शन घडवितो. ज्ञानपिपासू रघू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा खरा अनुयायी वाटतो. ''नामदेव कांबळेंनी रघूचे व्यक्तिमत्व अधिक उठावदार करण्याचा प्रयत्न केला आहे. रघूचे व्यक्तिमत्व चिंतनशील आहे सुधारणावाद आणि पुरोगामीत्व स्वीकारताना तो कुठेही विचाराच्या अतिरेकीपणाला खतपाणी घालत नाही.''[५] असे मत किशोन सानप यांनी मांडले आहे.

रघूचा स्वाभिमानी स्वभाव अनेक प्रसंगातून व्यक्त झालेला आहे. आपल्या मांग समाजाच्या वाट्याला चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे जी भिकेची कामे आलेली असतात. ती त्याला आवडत नाहीत. मांगांनी स्वाभिमानाने जगायला पाहिजे, असे त्याला वाटते. मांगांच्या भीक मागण्याच्या प्रवृत्तीचा तो सतत विरोध करीत राहतो.

रघूची व्यक्तीरेखा एका समंजस मागासवर्गीय तरुणांची व्यक्तिरेखा म्हणून वाचकाच्या मनावर वेगळा ठसा उमटविते. सहज स्वाभाविक तरुण सुलभ भावना निराकार तारुण्य सुलभ बालीश शृंगारिक अनुराग, संयमी स्वभाव इत्यादी मुळे रघुबद्दल आदरभाव निर्माण होतो. कोठेही त्याची छचोर वागणूक आढळत नाही. रघूचे कौशल्यपूर्ण, अल्पाक्षरी संवाद वातावरणात वास्तवाचे भान राखतात.

प्रसंगानुरुप सहज सोपी भाषाशैली व स्वाभाविक घटना प्रसंग इत्यादी वैशिष्ट्यांमुळे कादंबरी अधिक मनोरंजक व स्वाभाविक बनते. रधुचे व्यक्तिचित्र जीवंत व भावनिक झाले आहे.

**वालंबी :-**

'उनसावली' व 'साजरंग' कादंबऱ्यातील व्यक्तिरेखाचा विचार करता, वालंबी ही विलक्षण लोभव व वास्तव व्यक्तीरेखा ठरते. 'या कहाणीतील वालंबी तेवढी खरी, बाकी सगळे निमित्तमात्र' असे राघववेळच्या प्रस्तावनेत लेखकाने म्हटले आहे. लेखकाने दलित समाजातील मायचे घडविलेले चित्रण, दलित कादंबरीच्या विश्वात अनोखे ठरले आहे. वालंबीचा पती कळणू जाधव अकस्मिक मरण पावल्याने ऐन तारुण्यात वालंबीला वैधव्य आलेले आहे. नवऱ्याच्या पाठीमागे नवऱ्याच्या स्मृती जपत त्याच्याशी मनोमन संवाद साधत भविष्य देण्यासाठी ती आयुष्यभर धडपडत राहते.

''वालंबी निरक्षर आहे परंतु अडाणी नाही. सर्वसामान्य स्त्री आहे परंतु मानवीपणाची परिपक्व जाण तिला आहे. दु:खात मोडून पडत नाही आणि सुखात हुरळून जात नाही.''[५] असे गौरवोद्गार किशोर सानप वालंबीबद्दल नोंदवतात.

'शिक्षण घेऊन नोकरी केल्याशिवाय आपल्या कुटुंबाचे दारिद्रय हटणार नाही. यासाठी मुलांना शिक्षण दे' हा वालंबीने नवरा मरताना शब्द दिल्यामुळे वालंबी रघुला आणि सीतारामला शाळेत घालते. पोटाची भूक भागवून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा मिळवताना वालंबीला अनेक यातना सहन कराव्या लागल्या तरी ती परिस्थितीपुढे नमते घेत नाही. आपली मुलं शिकून मोठी व्हावीत, गावातील मांग समाजाने पोरांनी नाव काढले असे म्हणाचे ही तिची मनोमन इच्छा असते. ती स्वत: निरक्षर असली तरी शिक्षणाचे महत्व तिच्या बोलण्या-वागण्यातून जाणवत राहते. त्यामुळेच ती रघूला उच्च शिक्षणासाठी पुसदला पाठवते.

वालंबी या व्यक्तिरेखेबद्दल दत्ता भगत म्हणतात, 'वालंबी' हीच खरी या कादंबरीची नायिका आणि एक मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. लेखक श्री. नामदेव कांबळे ह्याची मूळ प्रेरणा वालंबीची गलबल व्यक्त करणं हीच आहे. दु:खाचा डोंगर झेलत रघू, सीताराम आणि कौसा ह्या तिघांना घडविणारी, त्यांच्यासाठी खस्ता खाता खाता आपली नाळ, नातेसंबंध आणि जगण्याचे अनुबंध जपणारी वालंबी हीच या कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. आयुष्यभर संघर्ष करताना ती कधी मोडून पडलेली नाही. तिचा पायही कधी वाकडा पडला नाही. कुणाशी वाईट सुध्दा वागत नाही. पायरुच्या यसोंता आणि आपल्या मुलात ती कधी फरक मानत नाही.

**व्यक्तिचित्रणे :-**

**सीताराम :-**

सीताराम हा वालंबीचा लहान मुलगा असून तो ही आपल्या भावाच्या, रघूच्या दिशेने जीवनाची वाटचाल करीत राहतो. आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण करुन महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुसदला जातो. तसेच वालंबीच्या कष्टाची व दु:खाची जाणीव ठेवून आईला घरकामात मदत करीत राहतो मात्र रघूच्या विचारांच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या सीतारामला चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे गावगाड्याशी करावी लागणारी तडजोड गुलामी वाटत राहते. धुलिवंदन सणाला वाघ होणे त्याला आवडत नाही. त्यातून मिळणारी भिक त्याला रुचत नाही.

''जायन. वाट पाहात आसतीन माणसं.''

''पडू दे तिकडं. मी नाही जात.''

''जायन बापा वर्साकाठी एकदाचत्त वाघ व्हया लागते ''

''जाव दे. बसायचं वाघ व्हऊन भिक माघतं.''

सीतारामला लहान वयात जाण आलेली दिसते. आपल्या भावाच्या रघूच्या पाऊलावर पाऊल ठेवून तो शिक्षण घेत राहतो. रघू इतका हुशार नसला तरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मॅट्रिक परीक्षा पास होतो

**पायरु :-**

पायरु हा वालंबीचा दिर व रघुनाथचा काका वालंबीच्या कुटुंबाशी प्रेमाने वागत असतो. कळणूच्या मृत्यूनंतर वालंबीला पायरुचाच आधार वाटत असतो. त्यामुळे वालंबी, पायरु ही दोन्ही कुटुंबे सुखदु:खात एकमेकांच्या आधाराने राहात असतात. रघू महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुसदला जाताना, वालंबी रघूला पायरु व हरणी काका काकींचे आशीर्वाद घ्यायला सांगते.

''जाय, लहाने बापूचं लहानी मायचं अन् दादा भाबीचं दर्शन घेऊन ये.'' त्यावेळी रघूला एस.टी.स्टॅंडवर निरोप द्यायला आलेला पायरु वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन करतो.

''रघू, आता घर सोडून लांब चाललात. सुधाऱ्हाय. कोणासंग भांडूतंटू नको. आपला अभ्यास भला आपूण भलं. आसा वाग नाही तर बसशीन भलतीकडचं फिरतं ''

''हो रे बापू.''

''नाही तर पोऱ्हं कॉलेजात जातात. शिकायचं सोडून काही बाही करत फिरतात म्हणं तस काही करु नाको बरं?''

यातून पायरुचे रघूबद्दलचे प्रेमच स्पष्ट होते. घर सोडून शिक्षणासाठी बाहेर पडलेल्या रघूला तो वेळीच मार्गदर्शन करतो.

तर वालंबीच्या पोटात दुखत आहे असे सीतारामने सांगताच, भाकरी करण्यापूर्वी, ''मोठीकून यायचं असतं अगुदर'' असे हरणीला तो बजावतो. अशा छोट्या मोठ्या प्रसंगातून पायरु कळणू भावाच्या मृत्यूनंतर वालंबीकडे व त्यांच्या मुलांकडे लक्ष देताना दिसतो.

हरणीच्या स्त्रीत्वावर डोळा ठेवून असलेल्या, गोपाळराव देशमुखाने वाईट विचाराने हरणीला घरी बोलावल्यावर मात्र अगतिक दुबळा ठरलेला पायरु विचार करु लागतो.

''कशी जाईल बायको ? काहून जावाव तिनं ?

इतकी का आमची इज्जत रस्त्यावर पडले ह्ये ?''

या विचारातून पायरुचा स्वाभिमान व्यक्त होतो. मात्र एक दरिद्री दलित मांग म्हणून तो काही करु शकत नाही, त्याला आपला राग व्यक्त करता येत नाही.

''म्हणाव का ह्याले, माणूस तूच ह्येय का बे ? आम्ही काय माणसं नाही ? जाव द्याबा त्यो मानदार गावचा कारभारी. आपून पडलो मांग. गाडीची बरुबरी कशी करता ईनगाडीच्या नपळ्याले ?''

आणि या बिकट प्रसंगातून सुटण्यासाठी तो आपल्या बायकोचं पोट दुखत असल्याचे गोपाळराव देशमुखाला सांगतो.

तर चातुवर्ण्य व्यवस्थेने लादलेले गावकीचं काम करताना पायरु मरता मरता वाचतो. वामन भोजाजीच्या आईच्या मृत्यूचा निरोप घेऊन जात असताना, तो पेनगंगा नदीच्या पूरात सापडून बेशुध्द होतो. नामदेव कांबळेंनी पायरुच्या रुपाने गावपातळीवर गावकीचे काम करणाऱ्या दलित माणसाचे दुःख रंगविले आहे.

रघू बरोबर सीताराम ही शिक्षणासाठी पुसदला जाताना पायरु खिशातून एक रुपया काढून सीतारामला खाऊसाठी देतो. रघूला लहान भावाला संभाळून घ्यायला सांगतो. मुलांनी शिक्षण घेऊन आपल्या घराण्याचं नाव काढलं याचा त्याला अभिमान वाटत असतो. त्यावेळी तर रघू सीतारामला जवळ घेऊन पायरु म्हणतो, ''मोठ व्हा, लय मोठे व्हा, आक्शी कुलीच्या दलिंद्रीचे पांग फेडा. देव तुमच्या पाठीशी ह्ये.''

असा हा पायरु वालंबीच्या कुटुंबाचा आधार रघू सीतारामचा मार्गदर्शक काका रात्री मक्याची राखण करायला गेल्यावर सर्पदंश होऊन मृत्युमुखी पडतो.

**हरणी :-**

हरणी ही पायरुची पत्नी आणि वालंबीची छोटी जाऊ आहे. तळहातावर पोट भरणाऱ्या दलित स्त्रीच्या वाट्याला येणारी मुस्कटदाबी तिच्याही वाट्याला आल्याचे जाणवते. सुखद:खाच्या प्रसंगात वालंबीला हरणीचा, हरणीला वालंबी मायचा आधार असतो. कुटुंबाचे पोट भरण्यासाठी हरणीला मोलमजूरी करावी लागत असते. वेळप्रसंगी खल प्रवृत्तीच्या गोपाळराव देशमुखांकडून शिलभ्रष्ट होण्याची वेळही येते मात्र त्यातून ती वाचते.

पायरुच्या मृत्यूनंतर एकाकी झालेल्या हरणीला पायरुच्या मातीला भावकीकडून अडविले जाते. भावकीबद्दल ती वालंबी जवळ बोलते, ''वालंबीऽ आपली जात लय वकटी त्यात भावकी तर त्याहूनबी वकटी, निऱ्हा म्हशीच्या शिंगावाणी. कव्हा दगा फटका करन त्याचा नेम नाही.'' यातून मांग समाजाबद्दलचे ती आपले मत नोंदवते. पायरुचे तेरावे हरणी स्वत:च्या घरावरील चार पत्रे एकनाथ वाण्याच्या दारात विकून पार पाडते. रुढी परंपरेत आणि प्रतिगामी विचारात अडकलेल्या मांग समाजाकडून हरणीची अडवणूक होते पायरुच्या मृत्यूनंतर यसोंता किंवा पद्मीचे लग्न करणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन भगाजीच्या निंबाबरोबर पाचशे रुपये हुंडा देऊन पद्मीचे लग्न ठरविते. अडाणी मुलाला हुंडा देणे गरजेचे नव्हते. या रघूच्या विचारावर 'पोरीची जात खाती-पिती झाली की काचणी लागते मायच्या जीवाले. डोळ्याले डोळा लागत नाही जसा वर्सा दिड वसार्सपासून वरी आली पोरीले. जग बी तर सुदं नाही. दुधात मिठाचा खडा पडायचं निमित्त व्हते. पण दुधच नासते न त्यानं. तशीच पोरीची जात!'' हा मांडलेला विचार हरणीचे स्त्री हृदय व्यक्त करतो. 'वालंबी' या व्यक्तीरेखेबरोबरच 'हरणी' ही सुध्दा कादंबरीतील महत्वाची स्त्री व्यक्तीरेखा ठरते

**वामनराव देवकाते :-**

रघुला महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात, पुसदच्या वास्तव्यात वामनराव देवकाते भेटतात. रघूचा वर्गमित्र माधव ह्याचे ते वडील असतात. वामनराव देवकाते हे रघूच्याच म्हणजे मातंग जातीतील सामाजिक कार्यकर्ते व सज्जन गृहस्थ असतात. त्यांना आपल्या समाजातील शिक्षण घेणाऱ्या होतकरु विद्यार्थ्यांबद्दल कमालीची आस्था असते. त्यामुळे रघू त्यांच्या नजरेत भरतो.

पूसदच्या वास्तव्यात रघू आणि सीतारामला मदत करणारे देवकाते आणि देवकाते यांचे कुटुंब त्यांच्या प्रगतीला उपयुक्त ठरते. घरापासून दूर पूसदला असलेल्या रघूला वामनराव देवकाते अनेक प्रसंगी मदत करतात. त्याला सरकारी वसतिगृहात प्रवेश मिळवून देतात. त्यामुळे रघुची भोजन-निवासाची चांगली सोय होते. ते महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय वसतिगृह समितीचे सदस्य असल्यानेच रघूला तेथे प्रवेश मिळतो.

शिक्षणासाठी पुसदला आलेल्या रघूला सामाजिक, राजकीय चळवळीपासून नेहमीच दूर राहण्याचा सल्ला देतात. तर बौध्दांच्या मुलांपासून जरा जपून वागण्याचा संदेश ही देतात. यातून रघूचे शिक्षणाकडे दुर्लक्ष घेऊ नये असेच त्यांना वाटत असते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी ते चांगले बोलतात. वसतिगृहात रघू आजारी आहे असे मोरे वार्डन कडून कळताच वामनराव देवकाते रिक्षातून रघूला घरी आणतात. आणि रघूच्या टायफाईडच्या आजारपणात त्यांची देवकाते व त्यांचे कुटुंब सेवा करतात. वालंबीचा ही पुसदच्या वास्तव्यात चार दिवस पाहुणचार करतात.

वामनराव देवकाते यांना शिक्षणाविषयी आस्था असते. ते आपल्या मुलीला डी.एड. करतात आणि रघूसारख्या हुशार, प्रयत्नशील, मुलाबरोबर लग्न करुन देतात. लग्नात त्याला अंगठी, घड्याळाबरोबर संसारोपयोगी वस्तूही देतात. आपल्या मुलीसाठी नंदासाठी तो योग्य वर होईल असा अंदाज त्यांनी बांधलेला असतो. अशाप्रकारे 'पूसद'च्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात भेटलेले वामनराव देवकाते रघूला सर्वतोपरी मदत करतात.

**प्राचार्य :-**

विद्यार्थी जीवनात शिक्षकांचे स्थान फार महत्वाचे आहे विद्यार्थी दशेमध्ये भेटलेले चांगले शिक्षक विद्यार्थ्यांला खऱ्या अर्थाने घडवत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विद्वानांच्या जीवनात ही थोर शिक्षकांचे महत्वपूर्ण स्थान आहे.

रघूच्या कॉलेज जीवनात भेटलेले प्राचार्य त्याला वेळोवेळी मदत करतात. म्हणून रघूनाथ आपले महाविद्यालयीन शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करु शकतो. पूसदला आपल्यानंतर जी अनेक चांगली माणसे भेटतात, त्यातील एक म्हणजे प्राचार्य. हे प्राचार्य एका भाषणातून रघूचे विचार ऐकतात आणि प्रभावित होतात आणि त्याला सर्वतोपरी मदत करतात. त्याची गरीबी व होतकरु वृत्ती लक्षात घेऊन त्याला ग्रंथालयात नोकरी देतात. त्याला खर्चाला पैसे हवेत यापेक्षा त्याला ग्रंथालयात हवी ती पुस्तके वाचायला मिळावीत. हा त्यांचा दृष्टिकोन असतो. तसेच रघूला ते आपल्या मुलाची शिकवणी घ्यायला सांगतात आणि त्याचेही पैसे देतात.

प्राचार्यांच्या घरी मुलाच्या शिकवणीसाठी रघू गेल्यावर प्राचार्य रघूला मातंग समाजातील म्हणून जातीभेदाचा कटू अनुभव कधी देत नाहीत. हे त्यांच्या स्वभावातील मोठेपण शिक्षण घेऊन आत्मविकास करु पाहणाऱ्या रघूच्या व्यक्तिमत्वाला नवी उभारी देते.

एकदा रघू आपल्या घरी मुलाच्या शिकवणीला दोन दिवस आला नाही, तर रघू आजारी तर पडला नसेल अशा शंका प्राचार्यांच्या मनात येताच, ते शासकिय वसतिगृहाचा नंबर मिळवून रघूची चौकशी करतात आणि रघू आजारी असून श्री. देवकाते यांच्याकडे गेला आहे असे समजताच, गाडी काढून रघूची भेट घेण्यासाठी श्री देवकाते यांच्या घरी जातात रघूच्या काळजीने अस्वस्थ होतात या प्रसंगातून प्राचार्य साहेबांचे प्रेमळ मनच व्यक्त होत राहते. तर पुढे जाऊन ते रघू आजारी असताना, प्राध्यापकांना रघूची हजेरी लावायला सांगतात.

अशा प्रकारे रघूच्या कॉलेजचे प्राचार्य रघूची मानसिकता, वैचारिकता व आर्थिकता समजून घेणारे प्राचार्य ठरले आहेत. मात्र त्याला कधीही ते उपकाराच्या ओझ्याखाली दाबत नाहीत. गरीब होतकरु विद्यार्थ्यांना मदत करणारे प्राचार्य साहेबांचे व्यक्तिचित्र आदरणीय ठरले आहे.

**यसोंता :-**

यसोंता हा पायरुचा मुलगा तर रघूचा चुलतभाऊ आहे. रघू शिक्षण घेऊन प्रगतीच्या दिशेने पाऊल उचलतो. मात्र यसोंता हरी जाधवाच्या घरी गडी म्हणून महिन्याला पंचवीस रुपयावर राबत असतो. पायरुच्या मृत्यूनंतर हरणी यसोंत्याला जगदीश सरपंचाकडे हजार रुपये सालाने ठेवते. शिक्षणापासून दूर राहिल्यामुळे अज्ञान, दारिद्र्य यातच यसोंत्याला जीवन जगावे लागते. रघू व सीताराम प्रमाणे तो आपली प्रगती करु शकत नाही.

**नंदा :-**

'उनसावली' या कादंबरीतील कथानकाचा विचार करता रघूच्या जीवनात नंदाचे स्थान महत्वाचे आहे. कारण तिनेही रघूला सहकार्य केले आहे. रघू पुसदला गेल्यानंतर तेथे वामनराव देवकाते यांच्या घरी गेल्यानंतर त्यांची कन्या नंदाशी ओळख होते आणि देवकाते कुटुंबाच्या घरी अधूनमधून जाण्यामुळे रघू-नंदामधील मैत्री अधिकच वाढत जाते. नंदा स्वभावाने प्रेमळ, सुशिल, असते. रघू टायफाईडने आजारी पडल्यावर वामनराव देवकाते रघूला आपल्या घरी घेऊन येतात तेव्हा नंदा शाळेत न जाता रघूची सेवा शुश्रुषा करीत राहते.

''कसे वाटते ?''

''अं ऽ ऽ बरे वाटते.''

''दूध करु का ?''

''अहं ऽऽ !''

घ्यान थोडे.

तो काहीच बोलला नाही. डोळे मिटून पडून राहिला. तिने दूध केले. त्याला उठून बसविले. दूध पाजून स्वयंपाकघरात गेली सफरचंद आणले चाकूने त्याच्या फोडी केल्या.

''घ्या''.

अहं ऽऽ !

''खा न खाल्याशिवाय बरे कसे वाटेल ?''

रघूची सेवा करीतच नंदा रघूच्या प्रेमात पडते आणि वामनराव देवकाते यांनाही रघू भावी जावई म्हणून पसंद पडतो. नंदा ही पत्नी म्हणून त्याच्या आयुष्यात त्याला अडचणीच्या काळात सोबत करीत राहते. तसेच नोकरी करुन रघूच्या संसारात आर्थिकही मदत करीत राहते. नंदाचे व्यक्तिमत्त्व आदर्श पत्नी म्हणून नजरेत भरणारे आहे

इत्यादी ठळक व्यक्तिचित्रणाबरोबर कौसा, पद्मी, गजरी, गुंफा, सुभाना, सुदामा, शिवऱ्या बुध्या, आदी पात्रे कादंबरीकाराने साचेबंद केली आहेत.

**प्रसंग :-**

'उनसावली' या कादंबरीत अत्यंत अस्वस्थ करणारे आणि मन सुन्न करणारे अनेक प्रसंग येतात. 'उनसावली' मधील प्रसंगवर्णने कधी लोभस तर कधी भेदक झाली आहेत. मांग समाजातील जी जी माणसे आपली व्यथा सांगतात, त्यातील प्रसंगाशी वाचकसुध्दा एकरुप होऊन जातो. पावसाची संततधार असूनही पायरुला सांगावा म्हणून पाठवताना पाटील अत्यंत धोरणीपणाने एस.टी.चे भाडे सुध्दा द्यायचे नाकारतो. सांगावा घेऊन पायीच निघालेला पायरु नदीच्या पुरातून वाहून जाताना मरता मरता वाचतो. कादंबरीकाराने चित्रित केलेला हा प्रसंग वाचकांना अस्वस्थ करणारा आहे

'वाचलो व ऽ मरीमाय तुह्या.'

मरीआईनेच आपल्याला वाचविल्याचे वाटून त्याला भरुन आले. नकळत त्याचे डोळे आसवांनी डबडबले. त्याला भरुन आले.

'काय नाव तुहं?' पाटलाने विचारले.

'पायरु.'

'कुठला ह्येस ?'

'वसारीचा.'

'कुठी चालला व्हता?'

'पिप्रिले आन केंद्रयाले जात व्हतो दुखुटा घेऊन.'

'कोण्या पिप्रीले ? कोणत्या केंद्रयाले ?'

'खोड्याच्या पिप्रीले. मोठ्या केंद्रयाले.'

'कोणाकडं ?'

'पिप्रीच्या परबत खोड्याकडं. केंद्रयाच्या तुळशीराम सापनकडं' परबती बापूची सासू मेली. 'तुळशीराम बापूची इहीन व्हती जान का माय.''

पोटासाठी गावकी करणारा, मयतीचा सांगावा घेऊन जाताना मरता मरता वाचणारा पायरु आपल्या डोळ्यापुढे जसाच्या तसा उभा राहतो. अशा स्वरुपाचा प्रसंग वाचताना रुढी परंपरेबद्दल मनात चिड निर्माण होते.

अंधश्रध्देपोटी घडलेला प्रसंग अगदी मजेदार आहे.

पायरुच्या तेरवीच्या प्रसंगी पिंडदान करीत असताना सर्वजण पिंडाला कावळा कधी शिवतो याची वाट पहात असतात. परंतु एकही कावळा पिंडाकडे फिरकत नाही. या प्रसंगी ''कुठी गेले आसतील कावळे?'' सुदामा आश्चर्य व्यक्त करतो. तर कंडी म्हणतो, ''यसोंता पिंडाचं पात्तर घेऊन कासरा दोन कासरे जाऊन पाह्य बरं. दिसनच कावळा. जाय रे रघू त्याच्या संगं.''

यसोंताने पत्रावळ उचलली. दोन हाताच्या तळव्यावर घेतली. तो पुढे निघाला. रघू त्याचे मागे चालू लागला. नदीकाठची झुडपे ओलांडून दोघे पुढे जाऊ लागले. कावळा दिसेना. काठ सोडून बाजूच्या मोकळ्या जागेत आले. दूरवर पाहात यसोंता म्हणला,

''ते पाह्य, लांब दूर दिसतात कावळे.''

'जायचे का तिकडे ?''

''हो , चाल.''

दोघे निघाले. नकळत रघूने वर आकाशाकडे पाहिले. आभाळ मोडून पडायला आलेले पाहून तो म्हणाला,

''राहू देत नाही तर. देऊ नदीत सोडून.''

''नाही रे.''

यसोंता आणि रघू कावळ्यांचा शोध घेतात तेव्हा कावळे मेलेल्या गुराचे मांस खाण्यात मग्न असतात त्यावेळी रघूच्या मनात विचार येतो, मेलेल्या गुरावर तुटून पडणारा कावळा पिंडाला शिवावा ही कल्पनाच विचित्र! कावळा माणसाचा पितर असेल घाण खाणारा कावळा पितर ? छे!

या प्रसंग वर्णनातून कादंबरीकाराने पिंडदान या अनिष्ठ प्रथेविरुध्द रघूच्या विचारातून घडविलेले चिंतन अर्थगर्भ वाटते. पिंडदानाच्या प्रसंगी यसोंता सोबत आलेला रघू शेवटी येसोंत्याला डोळे मिटायला सांगून पिंड स्वत:च्या तोंडात टाकून नदीच्या पाण्यात सोडतो आणि नंतर डोळे उघडायला सांगून पिंड कावळ्याने उचलून नेहल्याचे सांगतो. अशा प्रसंगातून रघूने अंधश्रध्देला संयमीपणाने विरोध केल्याचे दिसते.

पुसदच्या कॉलेजमध्ये शिकलेला रघू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार तत्त्वज्ञानाने भारावून गेलेला असतो. आपल्या गावी भीमजयंतीच्या वेळी घराला तोरण बांधायचे ठरवितो. तेव्हा मांग वेटाळातील लोक त्याला विरोध करतात,

''भाबी, लेकाने समजून सांग जरा .''

''काय झालं ? ''

''तुमचा रघू तोरण लावतो म्हंते.''

''गुढीसाठी आंबे बा आणले त्यानं.''

''भीमजयंतीले मांग गुढी लावतात का कव्हा ? तुम्हीच सांगा ''

या प्रसंगातून कादंबरीकाराने मांग समाजातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीची मानसिकता स्पष्ट केली आहे. दीन दलितांसाठी आयुष्यभर झटलेले आंबेडकर मातंगांना आपलेसे वाटत नाही. याचे अचूक चित्रण या प्रसंगातून चित्रित झाले आहे या प्रसंगातून थोर महापुरुषांची समाजाकडून उपेक्षाच झालेली दिसते.

नामेदव कांबळे यांनी 'उनसावली' कादंबरीतील अनेक प्रसंगातून प्रामाणिकपणे आपला मूल्यविचार मांडला आहे. कादंबरीतील प्रसंग वाचताना वाचकाच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. अनेक प्रसंगी मन सुन्न होते त्यामुळे वाचकही त्या प्रसंगाशी एकरुप होऊन जातो. काही प्रसंग मानवी मनाला चटका लावणारे आहेत.

**मनोविश्लेषण :-**

ह.ना. आपटे, ना. सी. फडके या श्रेष्ठ कादंबरीकाराप्रमाणेच नामदेव चं. कांबळे यांनी 'उनसावली' या कादंबरी लेखनात 'रघू', 'वालंबी', 'पायरु', 'सीताराम' या व्यक्तीरेखांचे मनोविश्लेषण करुन त्याची मानसिकता आणि वैचारिकता स्पष्ट केली आहे. मनोविश्लेषण लेखनातून व्यक्तीरेखेची त्या त्या प्रसंगाची भावनिकता, मनोवृत्ती स्पष्ट होत असते. त्यातून त्या व्यक्तीरेखा जिवंत वाटतात व प्रत्ययकारक ठरतात.

गोपाळराव देशमुख मनात वाईट विचार ठेवून हरणीला घरी बोलवतो. त्याचे खरे कारण पायरुला कळल्यावर त्याचे मन विचार करु लागले, ''कशी जाईलबायको ? काहून जावावं तिन ? इतकी का आमची इज्जत रस्त्यावर पडेल ह्ये?'

पण माघं ती गेल्यानच तर फटी फावली त्याले. व्हते चुकी कवा बोव्हा. एम्ही हात पाय झाडून भुकंनं जीव देऊ आपूण. पण बायकोले नाही सांगायचो. तसं. ती बी नाही करायची काही बाही.

म्हणाव का ह्याले, माणूस तूच ह्येस का बे ? आम्ही काय माणसं नाही ? जाव द्या बा. त्यो मानदार. गावचा कारभारी. आपून पडलो मांग. गाडीची बरुबरी कशी करता ईन गाडीच्या नळ्याले?''

पायरुच्या या मनोविश्लेषणातून अन्यायाबद्दलची चीड त्याचबरोबर दुबळेपण व्यक्त होत राहते.

चौदा एप्रिलला आंबेडकर जयंती दिवशी बौध्द समाजातील आंबेडकर जयंतीचे मंगलमय वातावरण पाहून रघूच्या मनातही आंबेडकर जयंती साजरी करण्याचे विचार येतात.

''लावावी का गुढी आपणही ? दाराला लावावे तोरण ? लावूतनच. बाबांचा आज जन्मदिवस. त्या महान प्रज्ञासूर्याची किरणे आजच्या दिवशी प्रकटली. नंतर सातत्याने तळपत गेली. त्या प्रकाशाने भारत वर्ष उजळून टाकले. काहींना त्यांनी दिपवले, भिवविले. काहींना संजीवन दिले. त्यातलेच एक आपण. आपण पाहिले नाही बाबांना आपणच कशाला इथल्या कोणीच पाहिले नसेल. परंतु त्यांचे विचार, त्याचे व्यक्तिमत्व, त्यांचे तत्वज्ञान आजही मार्गदर्शन करते. त्याला उतराई व्हायला नको ? हाच तर एक मार्ग आहे त्यासाठी.''[८]

रघूच्या या मनोविश्लेषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीचे त्याचे प्रेम, निष्ठा दिसून येते तर आंबेडकर जयंतीच्या प्रसंगी रघूच्या मनातील विचार त्याची मानसिकता स्पष्ट करतात.

''दलितांतील ही दरी मिटणार नाही कधी ? बाबांच्या नावावर तरी मिटणार नाही काय ? आपण हिंदू धर्मीय, आपली हिंदू मानसिकता, म्हणून बाबांचे नाव घ्यायचा, त्याच्या विचारावर भाष्य करायचा अधिकार नाही आपल्याला ? त्यांच्या विचारांनुसार वागुनही ? का असे ? शाहू महाराज हिंदू होते, ज्योतिबाही हिंदूच होते ते का चालतात बौध्दांना ? त्यांच्या पुरोगामी विचारामुळेच ना ? विचार तर कोणाचेही यावेत. त्यांची चिकित्साही करता यावी. तिथे जात, पंथ आड येता कामा नये. पण येतो मात्र. माणसाच्या मानगुटीवर बसलेले हे जाती, धर्माचे भूत उतरणार नाही ना कधी ? कधीच उतरणार नाही का ?

रघूच्या या मनोविश्लेषणातून कादंबरीकाराने परिवर्तनशील विचार बोलून दाखवला आहे.

अशा प्रकारे कादंबरीतील महत्वपूर्ण व्यक्तिरेखांच्या मनोविश्लेषणातून त्या व्यक्तिरेखा साकार झाल्या आहेत

## संदर्भ


१) राघववेळ प्रस्तावना, आवृत्ती चवथी - फेब्रुवारी २०००, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, ४७३, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०, पृ.५

२) किशोर सानप, 'अनुष्टुभ', जानेवारी-फेब्रुवारी, २०००, पृ.४५

३) प्रा. डॉ. रवींद्र शोभणे, लोकसत्ता, विदर्भ विशेष, दि.२७-१२-९५

४) प्रा.जान्हवी संत, 'कादंबरी एक वाङ्मय प्रकार', आवृत्ती प्रथम, नोव्हेंबर १९७१, मोघे प्रकाशन, कोल्हापूर - २.

४) किशोर सानप, 'अनुष्टुभ', जानेवारी-फेब्रुवारी, २०००, पृ.४६

६) उ.नि.पृ. ४८

७) नामदेव कांबळे, 'उनसावली', पहिली आवृत्ती, १९९७, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, ४७३, सदाशिव पेठ, पुणे, पृ २१६

८) उ.नि.पृ.२२५, २२६